बालकथा

माशीची पंचाईत

एक वाघ होता. तो म्हणायचा की मी या जंगलाचा राजा आहे. पण तो काही राजा नव्हता. तशा बढाया मारायचा. त्या वाघाची एक मैत्रीण होती. ती होती माशी. तिच्या घरी दुसऱ्या दिवशी पाहुणे येणार होते. म्हणून तिने त्यांचा चांगला आदरसत्कार करायचे ठरवले. पण आपण काय आणि कोठून आणणार असा तिला प्रश्न पडला. कोणाला बरे सांगूया हे काम? असा विचार ती करू लागली. जंगलात माकड सगळीकडे फिरत असते. ती त्याच्याकडे गेली. गयावया करून म्हणाली. अरे माकडदादा माझे एक काम कर ना! माकडाने विचारले काय काम करू तुझे? तिने सांगितले की माझ्याकडे काही पाहुणे येणार आहेत. त्यांच्या आदरसत्कारासाठी काही सामान मला आणून दे. माकडाने हो म्हटले खरे पण ते बिलंदर होते. त्याने ऐनवेळी तिला दगा दिला. पाहुणे येण्याच्या आधी  त्याने नकार दिला.

मग माशी निघाली सिंहाकडे. तो जंगलाचा राजा पडला त्यानेही चक्क नाही म्हणूनच सांगितले. बिचारी माशी मग गेली हत्तीकडे.  हत्तीभाऊ हत्तीभाऊ माझी विनंती ऐकशील का? तिने गयावया केली. पण हत्तीभाऊंना कुठला आलाय वेळ? त्याने माशीला शेपटीने उडवून दिले. माशी अगदी मेटाकुटीला आली होती. तिने शेवटी वाघाकडे जायचे ठरवले. मग ती वाघाकडे गेली. वाघभैया बघ नारे सगळे मला नादी लावतात. तू तरी माझे काम करं. एवढ्याशा माशीचे काय काम करायचे असे वाघ मनात म्हणाला. पण वरवर तसे न म्हणता त्याने माशीचे ऐकून घेतले. वाघभैय्या माझ्या घरी पाहुणे येणार आहेत, त्यांचा आदरसत्कार करायचा आहे. त्यांच्यासाठी मला या वस्तू आणून दे ना. वाघोबाने हो म्हटले पण त्याने त्या वस्तू आणल्याच नाहीत. मोठा लबाड होता तो.  दुसऱ्या दिवशी माशीकडे आले पाहुणे. पण वाघोबाचा पत्ताच नाही. माशी बिचारी हिरमुसली. वाघाने तिला फसविले होते. माशीने मग इकडून तिकडून झाडावरून  मध गोळा केला व पाहुण्यांना दिला. तिच्या मनाप्रमाणे तिला पाहुणचार करता आला नाही. तिचे पाहुणे मग तिच्यावर रुसून निघून गेले.  माशी रड रडली पण रडून काय उपयोग. ती रडत असतानाच वाघ आला. तिला खिजवू लागला. कसले पाहुणे आणि कसला आदर करतेस तू एवढीशी माशी.  बिचारी माशी उग्गी बसली.

राघव प्रकाश क्षीरसागर,
इयत्ता चौथी
मुष्टिफंड महालक्ष्मी विद्यालय, पणजी.